| MHBI060011252015 | नि. दि. दावा क्र. | १३३/२०१५ |
|---|---|---|
| | श्रीहरी -वि- राजेश | |
| | निशाणी क्र. ५७ | वर पुढे सुरु |

## प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची शपथेवर जबानी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **नाव** | : | राजेश प्रतापराव पांडे, | | | |
| **वय** | : | ४४ | वर्ष | **धंदा** | शेती, |
| **राहणार** | : | धानोरा बु., ता. अंबाजोगाई, जि. बीड. | | | |

प्रतिवादीच्या साक्षीदाराला शपथपत्रातील मजकूर मान्य व कबूल असल्याचे शपथेवर सांगितल्याने तसेच त्यांची सही मान्य केल्याने ते वाचून दाखल केले. त्यास **निशाणी क्रमांक ५७** दिली. प्रतिवादी (साक्षीदार) व प्रतिवादीचे विधीज्ञ हजर.

## उलट तपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. एल. एस. देशपांडे यांच्या मार्फत

मी इयत्ता बारावीपर्यंत शिकलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी हे धानोरा येथील रहिवाशी असुन ते शेती व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त प्लॉट हे जमिन गट क्र. ४९३ मधील आहेत. गट क्र. ४९३ ही वादींची वडिलोपार्जीत मिळकत आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. गट क्र. ४९३ मध्ये जी प्लॉटींग झालेली आहे ते क्षेत्र वादींचे सामाईक क्षेत्र आहे किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही खरेदी करतेवेळी वादींच्या मालकी व ताब्यामध्ये होती. वादमिळकत खरेदी घेतेवेळी मी खरेदीखतामध्ये नमुद चतुसिमा वाचल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतामध्ये चतुसिमेमध्ये पुर्वेस २० फुटाचा रस्ता हे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखतातील चतुसिमेमध्ये १०० फुटाचा रस्ता असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की,मारोती व शिवदास यांच्या सहया न घेता व त्यांच्या संमतीविना सदर खरेदीखत करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की,रस्त्यालगत २ प्लॉट सोडुन उर्वरीत जमिन ही वादीच्या वहितीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे खरदीखतामध्ये दक्षिणेस व

उत्तरेस वादीची बाकीच्या गटातील शिल्लक जमिन हे चतुसिममध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला घर बांधण्यासाठी जमिनीची आवश्यकता असल्याने सदर प्लॉट मी खरेदी केले आहेत.

प्रश्न: तुमच्या खरेदीखतामध्ये पुर्वेस २० फुट रस्ता तर प्रस्तुत शपथपत्रामध्ये पुर्वेस राज्यरस्ता असे नमुद आहे तर खरेदीखत व शपथपत्र यापैकी कोणत्या चतुसिमा ख-या आहेत ?

उत्तर: खरेदीखत व शपथपत्र या दोन्हीमधील चतुसिमा ख-या आहेत.

मी बांधकाम करण्याच्या पुर्वी ग्रामपंचायत धानोरा (बु) यांची परवानगी घेतली होती. घर बांधण्यापुर्वी चारही बाजुने ५ फुट जागा सोडणे हे बंधनकारक आहे हे माझे परवानगीमध्ये नमुद आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की,माझे घराचे अंदाजे एक ते दिड फुट बांधकाम हे वादीच्या मिळकतीमध्ये आले आहे. हे म्हणणे खरे नाही की,हे माझे लक्षात आल्यानंतर मी वादीस करारनाम्याद्वारे पश्चिम बाजुने दक्षिणोत्तर २ बाय ३३ फुट जागा ही वादीच्या हक्कात सोडुन दिल्याबाबत लिहुन दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की,त्यामुळे माझा प्लॉट हा ३३ बाय ६४ फुट इतका झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की,त्याप्रमाणे माझे नावाची नोंद ग्रामपंचायत पिटीआरमध्ये नमुद केली आहे. हे म्हणणे खरे नाही की,वादी क्र. १ व २ यांच्या प्लॉटमधील १० बाय ६६ फुट क्षेत्रफळाची मिळकत ही वादीच्या हक्कात, ताब्यात व मालकीची आहे. आजमितीला धानोरा(बु) ग्रामपंचायतीचे सरपंच आबासाहेब पांडे हे आहेत. यापुर्वी जनार्धन पांडे हे सरपंच होते किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की,ग्रामपंचायत ही आमच्या ताब्यात असल्यामुळे ग्रामपंचायत सदरी संगणमत करुन आमच्या नावाची नोंद पिटीआर उता-यावर केली आहे. याबाबत वादीने ग्रामपंचायत धानोरा यांना वेळोवेळी तक्रार अर्ज केले आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे नाही की,फेब्रुवारी-२०१३ मध्ये वादीने मला मोकळया जागेतुन मला बेदखल करण्याच्या धमक्या दिल्या हे माझे शपथपत्रातील कथन खोटे आहे.

वादी क्र. ३ शिवदास याने माझेविरुध्द आरसीसी क्र. ३३८/२०१५ ची माझेविरुध्द दाखल केली आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की,मी रे.मु. नं.६८/२०१३ चा मनाई हुकुमासाठी वादीविरुध्द दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यातदेखील मी चतुसिमेमध्ये पुर्वेस २० फुट रस्ता असे नमुद केले होते. हे म्हणणे खरे नाही की,प्लॉट खरेदीवेळी वादीने मला नकाशाप्रमाणे रस्ता दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की,वादीने मला १०० फुट रस्ता कुठेही कबुल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,माझे शपथपत्रामध्ये वादीने मला १०० फुट रस्ता देण्याचे कबुल केल्याचे खोटे कथन केलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की,माझे शपथपत्रामध्ये मला दिनांक ०५/०६/२०१५ रोजी मारहाण करुन धमक्या दिल्याचे केलेले कथन हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की,दिनांक ०२/०८/२०१६ रोजी वादी क्र. १ ते ३ यांनी मला केलेल्या मारहाणीबाबतचे कथन हे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की,घराच्या पुर्वेकडुन १०० फुट किंवा ३० मिटर रस्ता हा प्लॉटच्या खरेदीकरण्यापुर्वी अस्तीत्वाता होता. हे म्हणणे खरे नाही की,माझे शपथपत्रातील संपुर्ण मजकुर व आज दिलेली साक्ष ही खोटी आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2026.03.30 17:38:50 +0530

दिनांक: ३०/०३/२०२६
अंबाजोगाई

(**प्रविण प्र. सागडे**)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अंबाजोगाई, जि. बीड.